RNI No. MAHBIL /2009/31733
Reg. No. MCS/173/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–अ

वर्ष ३, अंक १००] बुधवार, नोव्हेंबर १, २०१७/कार्तिक १०, शके १९३९ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १६६**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०० ०३२,
दिनांक १ नोव्हेंबर २०१७.

**अधिसूचना**

**किटकनाशके अधिनियम, १९६८.**

क्रमांक सीपीएस-१११७/प्र. क्र. २०४/१७-अे.—ज्याअर्थी—

(क) यवतमाळ जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर यासोबत जोडलेल्या अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या किटकनाशकांचा वापर केल्यानंतर शेतमजूरांना आणि शेतकऱ्यांना विषबाधा झाल्याचे वृत्त असून त्यापैकी १८ जणांनी त्यांचे प्राण गमावले आहेत.

(ख) ही किटकनाशके आत्यंतिक विषारी किंवा अति विषारी आहेत किंवा मध्यम विषारी आहेत परंतु अनाधिकृत रीतीने संमिश्रणासाठी वापर करण्यात येत असल्यामुळे त्याची अत्यंत विषारी बाधा होते.

(ग) यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किटकनाशकांचा किंवा त्यांच्या कोणत्या गटांचा वापर किंवा अशा किटकनाशकांचे कोणतेही मिश्रण हे, मनुष्यजातीस किंवा प्राण्यांना धोकादायक ठरू शकते.

(घ) महाराष्ट्रामध्ये यापुढे किटकनाशकांची विक्री, वितरण किंवा वापर यावर त्यांचे घातक परिणाम लक्षात घेता, आढावा कालावधीत त्यांच्यावर कायम बंदी चालू ठेवण्याची आवश्यकता आहे, असे राज्य शासनाचे मत बनले आहे.

(ड) ज्याअर्थी, किटकनाशके अधिनियम, १९६८ यामध्ये पुढील ६० दिवसांच्या कालावधीकरिता अशा किटकनाशकांना मनाई करण्यासाठी खंड २७ अन्वये तरतूद करण्यात आली आहे.

त्याअर्थी, आता, किटकनाशके अधिनियम, १९६८ (१९६८ चा ४६) याच्या कलम २७ च्या पोट-कलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे किटकनाशकांची विक्री, वितरण किंवा वापर किंवा यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या कोणत्याही गटाच्या मिश्रणास सदर बाबतीत अन्वेषण करण्याच्या अधीन राहून, **राजपत्रात** अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या कालावधीकरिता अकोला, अमरावती, बुलढाणा, वाशिम व यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये मनाई करीत आहे.

**अनुसूची**

| अनु. क्र. (१) | कीटकनाशकाचे किंवा मिश्रणाचे नाव (२) | वापरण्याच्या सूत्रासह टक्केवारी (३) |
|---|---|---|
| १ | प्रोफेनोफोस ४०% + सीपरमेथ्रीन ४% ईसी | ४०% + ४% ईसी |
| २ | फिप्रोनील ४०% + इमीडॅक्लोप्रीड ४०% ईसी | ४०% + ४०% ईसी |
| ३ | ऍसिफेट ७५% एससी | ७५% एससी |
| ४ | डीफेन्थीरोन ५०% डब्ल्यूपी | ५०% डब्ल्यूपी |
| ५ | मोनोक्रोटोफॉस ३६% एसएल | ३६% एसएल |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विजय कुमार,**
शासनाचे प्रधान सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya (Annex), Mumbai 400 032, dated the 1st November 2017.

*NOTIFICATION*

INSECTICIDES ACT, 1968.

No. CPS. 1117/CR-204/17-A.—Whereas, the State Government is of the opinion, for the reasons such as—

(*a*) Large number farm labourers and farmers have been reported to have been exposed to poisoning out of which over 18 have lost their lives after using insecticides specified in the schedule appended hereto, in Yavatmal district ;

(*b*) These insecticides are either extremely or highly toxic or moderately toxic but have highly toxic effect due to use for blending in an unauthorised manner ;

(*c*) that, the use of the insecticides specified in the schedule appended hereto, or any batches thereof or any combinations of such insecticides is likely to involve risk to human beings or animals ;

(*d*) Further sale, distribution or use of these pesticides in Maharashtra needs to be banned during the period of review of their continued use keeping in view their hazardous effects ;

(*e*) Whereas, there is a provision in Insecticides Act, 1968 under clause 27 to prohibit such insecticide to use for further 60 days. etc.

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 27 of the Insecticides Act, 1968 ( 46 of 1968), the Government of Maharashtra hereby prohibits the sale, distribution or use of the insecticide or any batches thereof any combinations thereof, as specified in schedule appended hereto, in the Akola, Amaravati, Buldhana, Washim and Yavatmal Districts, for the period of sixty days, from the date of publication of the notification in the *Official Gazette,* pending investigation into the matter.

*Schedule*

| Sr. No. (1) | Name of the Insecticide or Combination (2) | Percentage with Formulation for use (3) |
|---|---|---|
| 1 | Profenophos 40% + Cypermethrin 4% EC | 40% + 4% EC |
| 2 | Fipronil 40% + Imidacloprid 40% EC | 40% + 40% EC |
| 3 | Acephate 75% SC | 75% SC |
| 4 | Difenthiron 50% WP | 50% WP |
| 5 | Monochrotophos 36% SL | 36% SL |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

BIJAY KUMAR,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.